# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव येथील राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM ) अंतर्गत कंत्राटी पद्धतीने फार्मासिस्ट, परिचारीका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, स्टॉफ नर्स सदरील पदे ठराविक वेतनावर कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत असून अर्हताधारक उमेदवारांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व संबंधीत उमेदवारांना ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे, त्या पदाची शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास आवश्यक त्या शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतिसह अर्ज मागविण्यात येत आहे.

| अर्ज व तोंडी मुलाखतीचे वेळ पत्रक | |
|---|---|
| अर्ज स्विकारण्याचे ठिकाण , दिनांक व वेळ<br>(टिप :- अर्ज पोस्टाने अथवा कुरीअरने स्विकारले जाणार नाहीत . उमेदवारांने दि :- २०/०८/२०१४ रोजी पर्यंत अर्ज शासकीय सुट्टीचा दिवस वगळुन स्वतः सादर करणे आवश्यक आहे.) | दिनांक :- २०/०८/२०१४ पर्यंत<br>(शासकीय सुट्टीचा दिवस वगळुन)<br>वेळः- सकाळी १० ते ४<br>ठिकाण : आर.सी.एच -२ कार्यालय, श्री.छत्रपती शाहु महाराज रुग्णालय, शाहु नगर जळगाव |
| अर्जाची छानननी व छाननीअंती पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द दिनांक | अर्जाची छाननी दिनांकः- २२/०८/२०१४<br>यादी प्रसिध्द दिनांकः- २३/०८/२०१४<br>(जळगांव शहर महानगरपालिकेच्या नोटीस बोर्ड व http://www.jcmc.gov.in/ या वेबसाईटवर) |
| पात्र उमेदवारांची तोंडी मुलाखत<br>दिनांक | दिनांक २६/०८/२०१४<br>वेळ ११ .००<br>ठिकाण मनपा प्रशाकिय इमारत जळगांव |

टिप :- यादीमध्ये नाव आलेल्या पात्र उमेदवारांनी दिः २६/०८/२०१४ रोजी सकाळी १० ते ११ वा. दरम्यान प्रत्यक्ष हजर राहुन नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

| **अ.क्रं.** | **पदाचे नांव** | **पद संख्या** | **किमान शैक्षणिक अर्हता** | **अनुभव** | **वयो मर्यादा** | **एकुण मानधन प्रतिमहा** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फार्मासिस्ट (Pharmacist) | ०४ | डि.फार्मसी | अनुभव असल्यास प्राधान्य | ३८ वर्ष | रु . ८,०००/- |
| २ | परिचारीका(ANM) | ०४ | १) एसएससी (दहावी)उत्तीर्ण<br>२) ANM कोर्स उत्तीर्ण<br>३) MNC कडे नोंदणी असणे आवश्यक | अनुभव असल्यास प्राधान्य | ३८ वर्ष | रु. ७५००/- |
| ३ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ ( लॅब टेक्निशियन) | ०४ | १)B.Sc पदवी उत्तीर्ण<br>२) DMLT उत्तीर्ण | अनुभव असल्यास प्राधान्य | ३८ वर्ष | रु. ७०००/- |
| ४ | स्टॉफ नर्स | ०८ | १) एचएससी (बारावी) उत्तीर्ण<br>२) GNM कोर्स उत्तीर्ण<br>३) MNC कडे नोंदणी असणे आवश्यक | अनुभव असल्यास प्राधान्य | ३८ वर्ष | रु. ९,०००/- |

**अटी व शर्ती:-**

१) राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणाऱ्या सर्व उमेदवारांची निवड थेट मुलाखतीने करण्यात येईल.

२) सदरील पदे NUHM समिती अंतर्गत राहतील त्याचा जळगांव शहर महानगरपालिका आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

३) एकुण पदाच्या संख्येमध्ये बदल होवू शकतो.

४) सदरील पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने केवळ प्रकल्प कालावधी पुरते भरावयाची असून प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील,तसेच नियुक्ती च्या कालावधीमध्ये आपले काम समाधानकारक न आढळल्यास तसेच कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तवणुक केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

५) सदर पदावर हक्क सांगणे साठी कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

६) तोंडी मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांनी खालील मुळ कागदपत्रांसह स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित रहावे.

- पासपोर्ट साईज फोटो (दोन), जन्म तारखे करीता(वयाचा दाखला/दहावी ची टी.सी/ सनद/जन्म प्रमाणपत्र), फोटो आय.डी /रहिवासी प्रमाणपत्र शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, (शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका/ रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र/ अनुभव प्रमाण पत्र)मुलाखतीच्या अनुषंगाने इतर आवश्यक मुळ व सत्य प्रत/ साक्षांकित प्रती).
- अनुभव प्रमाणपत्रावर ,सध्या काम करत असलेले संस्थेचे नाव, सध्या धारण केलेले पद, कामाचा कालावधी व जबाबदारी,सध्या मिळत असलेले वेतन ई. बाबी स्पष्टपणे नमुद करुन संस्थेच्या लेटरपॅडवर सादर करावे.

७) छाननी अंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवेश देण्यात येईल.

८) मुलाखतीसाठी एकास पाच (१.५) या प्रमाणे उमेदवारांना मुलाखतीस बोलावण्यात येईल.

९) जास्त उमेदवार आल्यास छाननी अंती एका पदास पाच उमेदवार या प्रमाणे पदानुसार पदवी/ पदविका/ GNM/ANM कोर्स / फार्मासिस्ट/लॅब टॅक्नेशियन इत्यादी या शैक्षणिक पात्रतेच्या अंतीम वर्षाच्या परिक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कट ऑफ लावण्यात येईल.

१०) एकुण १०० गुंणाची परीक्षा राहील.

११) यामध्ये पदवी /पदविका/ GNM/ANM कोर्स /फार्मासिस्ट/लॅब टेक्नेशियीनच्या शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार जास्तीत ८० गुण देण्यात येतील.

अ) शेवटच्या वर्षाचे गुण ग्राहय धरल्या जातील.

ब) २० गुण अतिरीक्त शिक्षण, अनुभव व विषय ज्ञानावर आधारीत राहतील.

१२ ) पात्र उमेदवार व प्रतिक्षा यादी वरील उमेदवार यांची यादी नोटीस बोर्ड व वेबसाईटवर त्याच दिवशी प्रसिध्द करण्यात येईल.

१३) उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा खाजगी व राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

१४) निवड/ नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर , कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार आयुक्त जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांनी राखून ठेवले आहेत.

१५) ही जाहीरात जळगांव शहर महानगरपालिकेच्या नोटीस बोर्ड व http://www.jcmc.gov.in/ या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच अर्ज व छाननी नमुना वेबसाईटवर उपलब्ध आहे. तो बिनचुक भरुन सादर करणे आवश्यक आहे.

**स्वाक्षरी /-**

आयुक्त

जळगांव शहर महानगरपालिका , जळगांव

प्रत:- नोटीस बोर्ड, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव